# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे

प्लॉट नं. आर. ७, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७.
पोस्ट बॉक्स : १४०७, फॅक्स : नं. : ९१-२०-२४५२८२९९
© ०२०-२४५२८१००, २४५२८२०० • E-MAIL : admin@msamb.com
Web Site : www.msamb.com

जा.क्र.कृपमं/शेताकयो/अंमलबजावणी/२०२०-२१/ १२३५ /२०२०,  पुणे, दि. ०७ सप्टेंबर २०२०.

-: परिपत्रक :-

प्रति,
**मा. सभापती/ सचिव,**
कृषि उत्पन्न बाजार समिती ....... (सर्व),
जिल्हा -

**विषय :- सन २०२०-२१ या हंगामात कृषि पणन मंडळाची शेतमाल तारण कर्ज योजना व्यापक प्रमाणात राबविणे बाबत.....**

महोदय,

शेतीमालाचा काढणी हंगाम सुरू झाल्याबरोबर शेतकऱ्यांच्या अर्थिक निकडीमुळे शेतीमाल विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत येत असल्याने शेतमालाचे बाजार भाव खाली येतात. सदर शेतीमाल साठवणूक करुन काही कालावधीनंतर विक्री केल्यास शेतकऱ्यांना जादा भाव मिळू शकतो. तेव्हा शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालासाठी योग्य भाव मिळावा या दृष्टीकोनातून कृषि पणन मंडळ सन १९९०-९१ पासून शेतमाल तारण कर्ज योजना यशस्वीरित्या राबवित असुन योजनेस बाजार समित्या व शेतकरी यांचेकडून वाढता प्रतिसाद मिळत आहे. या योजनेमध्ये **तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सुर्यफूल, चना, भात (धान), करडई, वाघ्या घेवडा (राजमा), ज्वारी, बाजरी, मका, गहू, हळद, काजू बी, बेदाणा व सुपारी** या शेतीमालावर शेतकऱ्यांना तारण कर्ज दिले जाते, हे आपणास विधित आहेच.

सध्या कोरोना या संसर्गजन्य आजारामुळे सर्व प्रकारच्या जागतीक बाजारपेठेवर फार मोठा विपरित परिणाम झाला असुन मानवीजीवन मोठ्याप्रमाणात प्रभावित झाले आहे. या परिस्थितीमुळे देशातील शेतीक्षेत्र व शेतकऱ्यांचे एकुणच अर्थचक्र कोलमडण्याची स्थिती निर्माण झाली आहे. या संकटाच्यावेळी शेतकऱ्यांच्या दृष्टिने सन २०२०-२१ चे खरीप आणि रब्बी हंगाम अत्यंत महत्वपूर्ण व निर्णायकी ठरणार आहेत. सन २०२०-२१ या हंगामात उत्पादित होणाऱ्या शेतमालास योग्य आणि चांगले बाजारभाव मिळाले तरच राज्यातील शेतकऱ्यांना या परिस्थितीतून सावरण्यासाठी मदत होणार आहे. त्यामुळे या परिस्थितीत शेतकऱ्यांना हातभार देण्याची राज्यातील बाजार समित्यांची जबाबदारी व कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे देशातील पणन कायद्यात झालेल्या बदलामुळे बाजार समित्यांना बाजार आवारा बाहेरील शेतमालाच्या खरेदी व्यवहारावर मिळणाऱ्या बाजार फीपासुन वंचित होण्याची वेळ आली आहे. त्यामुळे बाजार समित्यांना बाजार आवारातील सोईसुविधामध्ये सुधारणा करून बाजार पेठेतील आवक स्थिर ठेवणे/वाढवणे अत्यंत गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत राबविण्यात येणा-या शेतमाल तारण कर्ज योजनेमुळे शेतकऱ्यांना होणारा लाभ व योजनेची उपयुक्तता विचारात घेता या योजनेमुळे शेतकरी त्यांचा शेतमाल बाजार समितीच्या बाजार आवारात आणतील यात शंका नाही. त्यामुळे सन २०२०-२१ या हंगामात राज्यातील सर्व बाजार समित्यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात सदर योजनेचा व्यापक स्वरूपात प्रचार करून प्रसिध्दी देऊन योजना मोठ्याप्रमाणात राबवुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेतून वाढीव बाजारभावाचा फायदा मिळवुन देणे आवश्यक आहे.

राज्याचे मा. पणन संचालक यांनी त्यांचेकडील जा.क्र. पणन ५/शेत.ता.कर्जयो/गोदाम/३३५४/२०१८, दि. १२/०९/२०१८ अन्वये महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४० (ई) अन्वये राज्यातील सर्व बाजार समित्यांनी कृषि पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेस सर्व प्रसार माध्यमातून व्यापक प्रचार व प्रसिध्दी देऊन योजना प्रत्यक्षात राबवावी तसेच यासंदर्भात अनुषंगिक इतर कार्यवाही करणेबाबतचे निर्देश दिलेले आहेत.

तरी शेतमाल तारण कर्ज योजना ही बाजार समितीच्या व शेतकऱ्यांच्या व्यापक हिताची असल्याने ही योजना सन २०२०-२१ या हंगामात आपल्या बाजार समितीच्या माध्यमातून राबवण्यासाठी आपण या योजनेत सहभागी व्हावे. आपल्या बाजार समिती मार्फत शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यासाठी बाजार समितीचे गोदाम आरक्षित ठेवण्यात यावे, समितीचे गोदाम उपलब्ध नसल्यास भाडेतत्त्वावर गोदाम उपलब्ध करुन अथवा वखार महामंडळाच्या गोदामामध्ये शेतमाल तारण कर्ज योजना राबवावी. समितीच्या कार्यक्षेत्रातील शेतक-यांना शेतमाल तारण कर्ज योजनेची माहिती होण्यासाठी सर्व प्रसार माध्यमातून या योजनेचा व्यापक स्वरुपात प्रचार करुन प्रसिध्दी देवून कोणत्याही परिस्थितीत शेतक-यांच्या शेतमालाची आधारभूत किंमतीपेक्षा कमी भावाने विक्री होणार नाही, यांची दक्षता घ्यावी. तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांना शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ मिळवून द्यावा, ही विनंती.

बाजार समित्यांना शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यासाठी योजनेची सविस्तर कार्यपध्दती, अटी व शर्तीचे सहपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे. त्यानूसार शेतमाल तारणात स्विकारताना तसेच तारणात स्विकारलेल्या शेतमालाच्या नोंदी व सुरक्षितता याबाबतीत सर्व अटी व शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करून योजनेसंदर्भात कोणत्याही प्रकारची अडचण अथवा तक्रार येणार नाही, याची सचिव यांनी दक्षता घ्यावी.

(सुनिल पवार)
**कार्यकारी संचालक**
महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे

**प्रत** :- माहितीस्तव सविनय सादर.

१. **मा. सहकार आयुक्त व निबंधक,** सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - १.
२. **मा. कृषि पणन संचालक,** महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

**प्रत** :- पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१. **उपसरव्यवस्थापक,** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, विभागीय कार्यालय, .............. (सर्व)
२. **जिल्हा उपनिबंधक,** सहकारी संस्था. .............. (सर्व)

त्यांनी आपले विभाग/जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांना शेतमाल तारण कर्ज योजना राबविणेसाठी मार्गदर्शन करून उद्युक्त करावे. तसेच योजनेची अंमलबजावणी योग्य प्रकारे होईल, याबाबत योजनेचा वेळोवेळी नियमीत आढावा घेण्यात यावा.

**सहपत्र - १**

## महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेची वैशिष्ट्ये तथा प्रमुख अटी व शर्ती

१. शेतमाल तारण कर्ज योजनेअंतर्गत फक्त उत्पादक शेतकऱ्यांचाच शेतीमाल स्विकारला जावा. व्यापाऱ्यांचा शेतीमाल या योजनेअंतर्गत स्विकारता येणार नाही.

२. प्रत्यक्षात तारणात ठेवण्यात आलेल्या **तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सुर्यफूल, चना, भात (धान), करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, वाघ्या घेवडा (राजमा), बेदाणा, हळद, काजू बी व सुपारी** या शेतीमालाच्या एकूण किमतीच्या ७५ टक्के पर्यंतचे कर्ज वार्षीक **६ टक्के** व्याज दराने योजनेस सुरूवात केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांचे (१८० दिवस) मुदतीकरीता अदा करण्यात येईल. बाजार समितीने शेतकऱ्याचा आधारकार्ड क्रमांक घेऊन व त्याची खात्री करूनच तारण कर्ज अदा करावे. प्रत्यक्षात तारण ठेवलेल्या शेतमालाची किंमत ही तत्कालीन बाजारभाव किंवा शासनाने जाहिर केलेली आधारभुत किंमत यापैकी जी कमी असेल त्यानुसार ठरविण्यात येईल.

३. **वाघ्या घेवडा (राजमा)** या शेतीमालासाठी आधारभुत किंमत जाहिर होत नसल्याने शेतकऱ्याने प्रत्यक्षात तारण ठेवलेल्या वाघ्या घेवडा (राजमा) चे बाजारभावानुसार किंमतीच्या ७५ टक्के अथवा रु. ३०००/- प्रति क्विंटल यापैकी कमी असेल ती रक्कम वार्षीक ६ टक्के व्याज दराने सहा महिन्याचे (१८० दिवस) मुदतीकरिता अदा करावी.

४. ज्या बाजार समित्या **सुपारी व काजू बी** या शेतीमालासाठी तारण कर्ज योजना राबविणार आहेत त्यांनी पुर्णपणे स्वत:च्या जबाबदारीवर प्रत्यक्षात तारण ठेवण्यात आलेल्या सुपारी व काजू बीच्या बाजारभावानुसार किंमतीच्या ७५ टक्के रक्कम अथवा रु. १००/- प्रति किलो यापैकी कमी असेल ती रक्कम वार्षीक **६** टक्के व्याज दराने सहा महिन्याचे (१८० दिवस) मुदतीकरिता अदा करावी.

५. ज्या बाजार समित्या **बेदाणा** या शेतीमालासाठी तारण कर्ज योजना राबविणार आहेत त्यांनी पुर्णपणे स्वत:च्या जबाबदारीवर प्रत्यक्षात तारण ठेवण्यात आलेल्या बेदाणा या शेतीमालाच्या प्रचलित बाजार भावाच्या कमाल ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु.७५००/- प्रती क्विंटल यापैकी कमी असणारी रक्कम वार्षीक **६ टक्के** व्याज दराने सहा महिन्यांचे (१८० दिवस) मुदतीकरीता अदा करावी.

६. **तारण कर्जाची मुदत ६ महिने (१८० दिवस) राहील. बाजार समितीने शेतकऱ्यांना दिलेल्या तारण कर्ज रक्कमेवर वार्षिक ६% प्रमाणे व्याज आकारणी करावी. पणन मंडळाकडून प्रतिपूर्ती करून घेतलेल्या तारण कर्जाबाबतीत बाजार समिती स्वमालकीचे गोदामात तारण कर्ज योजना राबवत असल्यास ३% प्रमाणे व वखार पावतीवर तारण कर्ज दिले असल्यास ५% प्रमाणे कर्ज व त्यावरील व्याजाची कृषि पणन मंडळास परतफेड करावी. उर्वरीत ३% / १% व्याज हे बाजार समितीस प्रोत्साहनपर अनुदान म्हणून देण्यात येत आहे.**

**७. बाजार समितीने पणन मंडळाकडून घेतलेल्या शेतमाल तारण कर्जाची सहा महिन्यांचे (१८० दिवस) आत रक्कम सव्याज परतफेड न केल्यास समितीला प्रोत्साहनपर व्याजाची सवलत अनुज्ञेय होणार नाही.**

८. ज्या शेतमालाचा योजनेत समावेश करण्यात आलेला आहे, त्या शेतीमालाच्या तारणावर फक्त शेतकऱ्यांना ते ज्या दिवशी शेतमाल तारणात ठेवण्याकरिता आणतील त्या दिवसाचे शेतमालाचे बाजारभाव विचारात घेऊन शेतमालाच्या होणाऱ्या एकूण किंमतीनूसार वरील (मुद्दा क्र. २ ते ५ मध्ये) नमूद केल्याप्रमाणे रक्कम तारण कर्ज म्हणून सहा महिने (१८० दिवस) मुदतीसाठी वार्षीक ६ टक्के व्याजदराने बाजार समितीने स्वनिधीतून **NEFT/RTGS द्वारे** त्याचदिवशी अदा करावयाचे आहे. बाजार समितीने याबाबतची सर्व माहिती ERP प्रणालीमध्ये दररोज नोंदविणे आवश्यक आहे.

९. बाजार समितीने स्वनिधीतून अदा केलेल्या तारण कर्जाचे प्रतिपूर्तीसाठीचा प्रस्ताव आठवड्यातून एक दिवस निश्चित करुन ERP प्रणालीद्वारे सादर करावा. प्रस्तावानूसार समितीने स्वनिधीतून दिलेल्या तारण कर्जाची प्रतिपूर्ती मुख्यालयाकडून समितीच्या स्टेट बँक ऑफ इंडिया मधील खात्यावर NEFT / RTGS द्वारे वर्ग करण्यात येईल. त्यासाठी बाजार समितीच्या स्टेट बँक ऑफ इंडिया मधील खात्याचा खाते क्रमांक व IFSC कोड नंबर प्रस्तावामध्ये नमुद केलेला असावा.

१०. बाजार समितीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रतिपूर्तीची रक्कम समितीच्या खात्यावर NEFT / RTGS द्वारे वर्ग/ प्रतिपूर्ती करणेसाठी शेतमाल तारण कर्ज विभागाने सरव्यवस्थापक यांची मान्यता घ्यावी. मात्र, समितीस समक्ष भेट देऊन रक्कम वर्ग करणेस विभागीय कार्यालयाकडून तपासणी अहवाल व शिफारस प्राप्त झाल्यानंतरच तारण कर्जाची प्रतिपूर्तीची रक्कम बाजार समितीच्या खात्यावर वर्ग करण्यासाठी धारिका लेखा विभागाकडे देण्यात यावी.

११. बाजार समितीकडून ERP प्रणालीद्वारे प्रस्ताव सादर केल्यानंतर विभागीय कार्यालयांकडून समितीस त्वरित समक्ष भेट देऊन बाजार समितीने तारणात ठेवलेला शेतमाल व त्याबाबतच्या सर्व नोंदी सहपत्र २ मधील ३ ते १५ नूसार ठेवल्याची खात्री, तपासणी व छाननी करुन त्याबाबतचा तपासणी अहवाल उपसरव्यवस्थापक यांचे शिफारशीसह मुख्यालयास सादर करावा. तपासणीच्या वेळी पणन मंडळाने दिलेल्या विहित नमुन्यात समितीने सर्व नोंदी ठेवल्याची व तारणातील शेतमालाच्या सुरक्षिततेसाठी योग्य ती दक्षता घेतल्याची खात्री करावी. यामध्ये काही त्रुटी निदर्शनास असल्यास त्यांची समक्ष पुर्तता करुन घ्यावी. तसेच योजनेचे उल्लंघन झाल्याचे अथवा अनियमितता निदर्शनास आल्यास त्याबाबत समितीस व मुख्यालयास त्वरीत कळवावे. बाजार समितीने याबाबत दुरुस्ती केल्यानंतरच समितीस पुढील प्रस्ताव सादर करता येईल, असे लेखी पत्र देऊन त्याची पोहच घेऊन तपासणीचा अहवाल शिफारशीसह मुख्यालयास सादर करावा.

१२. तारण कर्ज योजना राबविणाऱ्या बाजार समित्यांना विभागीय कार्यालयातील उपसरव्यवस्थापक/ संबंधीत अधिकारी यांनी नियमित (मासिक) भेटी देऊन तारणातील शेतमालाचा शिल्लक साठा व सुरक्षितता याची तपासणी करावी, तारणातील विक्री झालेला शेतमाल, शेतकऱ्यास मिळालेले बाजारभाव व झालेला नफा तसेच शिल्लक मालाच्या नोंदी याबाबत तपासणी करून तसे बाजार समितीनिहाय मासिक अहवाल मुख्यालयास सादर करावेत.

१३. बाजार समितीस वर्ग केलेल्या रक्कमेचा तपशिल लेखा विभागाकडून त्याच दिवशी संबंधीत विभागीय कार्यालयास कळविण्यात यावा. ज्यावेळेला बाजार समितीच्या बँक खात्यात रक्कम जमा होईल, त्या तारखेपासून व्याजाची आकारणी करण्यात येईल. याकरिता पुढील मागणी करतेवेळी बँक पासबुकाची झेरॉक्स प्रत कर्ज मागणी अहवालासोबत द्यावी. त्यानुसार व्याज आकारणी कर्ज विभागाने करावी. विभागीय कार्यालयाने तारण कर्जाची मुद्दल व व्याजाची वसूली वेळेवर होणेबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

१४. तारण माल ठेवण्यासाठी बाजार समितीने तीच्या गोदामाचा विनामुल्य वापर करावयाचा आहे. गोदाम भाडे, गोदामापर्यंतचा वाहतुक खर्च, देखरेख खर्च, शेतमालाचा विमा इत्यादी खर्चाचा अधिभार बाजार समितीने सहन करावयाचा असून गोदामामध्ये शास्त्रशुध्द पध्दतीने मालाची साठवणूक करण्याची जबाबदारी संबंधित बाजार समितीची राहील.

१५. जे शेतकरी तारण मालाची स्वत: विक्री करणार असतील त्यांनी सहा महिन्यात (१८० दिवसांचे आत) कर्ज रकमेची व्याजासह परतफेड करुन तारण माल ताब्यात न घेतल्यास या शेतमालाची विक्री बाजार समितीने करावयाची आहे.

१६. तारण कर्जफेडीपोटी जमा झालेली रक्कम पुन्हा तारण कर्ज देण्यासाठी न वापरता त्या रक्कमेचा भरणा त्वरित कृषि पणन मंडळाकडे करावयाचा आहे. तसेच योजनेस सुरूवात केल्यापासून १८० दिवसांचे आत संपूर्ण तारण कर्ज रक्कमेचा भरणा कृषि पणन मंडळाकडे करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत बाजार समितीची आहे. वसूल झालेल्या कर्जाची एकूण रक्कम रु.५/- लाखापेक्षा कमी असल्यास आठवड्यातून दोन वेळा पाठवावी व रु. ५/- लाखापेक्षा जास्त असल्यास त्वरीत पाठवावी.

१७. तारण कर्जाची रक्कम बाजार समिती / शेतकरी यांनी कृषि पणन मंडळाकडे वेळेवर भरणा न केल्यास विक्री झालेल्या तारखेपासून अथवा १८० दिवसांची मुदत संपल्यापासून या रक्कमेवर मुदतीनंतर दि. २९/०३/२००६ च्या पत्रान्वये निश्चित केलेल्या व्याजदराप्रमाणे सहा महिन्यांपर्यंत वार्षिक ८ टक्के दराने व त्याचे पुढील ६ महिन्यांसाठी वार्षिक १२ टक्के व्याजदराने व्याज आकारणी केली जाईल. तथापि, अशा परिस्थितीमध्ये समितीने तारण कर्ज घेतल्यापासून १८ महिन्याचे आत संपुर्ण कर्जाची सव्याज परतफेड करणे आवश्यक आहे.

१८. तारण कर्जाचा कालावधी १८० दिवसांचा असून काही अपरिहार्य परिस्थितीमुळे विक्रीच्या वेळी मंदीचे लक्षण असल्यास व पुढील मुदतीत या मालाचे बाजारभाव वाढण्याची शक्यता असल्यास त्याबाबत संबंधित बाजार समितीचे संचालक मंडळाने साकंल्याने विचार करुन ठराविक मुदतवाढीचा रितसर प्रस्ताव कृषि पणन मंडळाकडे विभागीय कार्यालयामार्फत ६ महिन्यांची मुदत संपणेपूर्वी किमान एक महिना अगोदर सबळ कारणांसह आगावू पाठवावयाचा आहे. मुदतवाढ देण्याचे / नाकारण्याचे अधिकार कृषि पणन मंडळाचे आहेत. मालाची विक्री करताना कोणत्याही प्रकारचा तोटा झाल्यास त्यास प्रथम शेतकरी व बाजार समिती जबाबदार राहतील.

१९. बाजार समितीने तारणात स्विकारलेल्या शेतमालाची माहिती ERP प्रणालीमध्ये दररोज नियमितपणे भरणे आवश्यक आहे. तसेच तारण कर्ज योजनेचा आढावा घेणेसाठी विहीत नमुन्यातील अहवाल कृषि पणन मंडळाकडे कर्जाचे प्रतिपूर्तीचे प्रस्तावासोबत पाठवावयाचा आहे. अहवाल प्राप्त न झाल्यास कर्ज रक्कम वितरीत करण्यात येणार नाही.

२०. शेतमाल तारण कर्ज योजनेचे बाजार समितीचे बँक पासबुकाची माहिती खालीलप्रमाणे विहीत नमुन्यात द्यावी.

---

बाजार समितीने स्वनिधीतून वाटप केलेल्या रक्कमेचा संबंधित आठवड्याचा बँक खात्याप्रमाणे तपशील

बाजार समितीचे नांव :-------------------------------------------------

बँकेचे नांव : -------------------------------------------------

बँक फोन क्र. : -------------------------------------------------

खाते क्र. : -------------------------------------------------

| **आरंभीची बँक शिल्लक रू. (स्वनिधी वापरल्याचा आठवडा)** | **स्वनिधीतून वाटप केलेली रक्कम रू.** | **पासबुकाप्रमाणे शिल्लक रक्कम रू. (स्वनिधी वाटप आठवडा मागणी दि. )** | **स्वनिधी वाटप परंतु वर्ग झाली नसलेली रक्कम रू.** | **शिल्लक रक्कमेपेक्षा जास्त / कमी वाटप रक्कम रू.** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ (१ - २) | ४ | ५ (३ - ४) |
| | | | | |
| | | | | |

## बेदाणा तारण कर्ज योजनेसाठी निकष / अटी व शर्ती

१. शितगृहामध्ये ठेवण्यात येणा-या बेदाण्याचा दर्जा व त्याचा ताबा इ. बाबत बाजार समितीने पूर्ण दक्षता घेऊन प्रचलित बाजारभावाच्या कमाल ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु.७५००/- प्रति क्विंटल यातील कमी असणारी रक्कम तारण कर्ज म्हणून ६ महिन्यांचे मुदतीने वार्षिक ६ टक्के व्याजदराने संबंधीत शेतकऱ्यास अदा करावी.

२. कोणत्याही परिस्थितीत बेदाण्याचा प्रतिकिलो दर हा रु. १००/- पेक्षा जास्त विचारात घेऊ नये.

३. या योजनेअंतर्गत छोट्या व मध्यम शेतकऱ्यांना लाभ व्हावा या दृष्टीकोनातून प्रती शेतकरी जास्तीत जास्त ५० क्विंटल एवढ्या शेतमालाचा तारणात स्विकार करण्यात यावा.

४. बेदाणा या शेतीमालासाठी तारण कर्ज योजना राबविणाऱ्या बाजार समितीस कमाल रु.५/- कोटीपर्यंत तारण कर्ज देता येईल व सदर तारण कर्जावर वार्षिक ६ % दराने व्याज आकारले जाईल.

५. सदर शेतमालाचा विमा उतरविण्याची जबाबदारी शीतगृह प्रमुखावर राहील. असा विमा उतरविणाऱ्या शितगृहाचीच बाजार समितीने या योजनेसाठी निवड करावी.

६. शितगृहामध्ये शास्त्रशुध्द पध्दतीने मालाची साठवणूक करण्याची जबाबदारी बाजार समितीची आहे.

७. बेदाणा तारण योजनेसाठी शेतमाल तारण कर्ज योजनेच्या इतर सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

## सुपारी व काजूबी तारण कर्ज योजनेसाठी निकष / अटी व शर्ती

१. ज्या बाजार समित्या सुपारी व काजूबी या शेतीमालासाठी तारण कर्ज योजना राबविणार आहेत, त्यांनी योजना राबविण्यासाठी त्यांचे कार्यक्षेत्रातील सहकारी संस्था/ खाजगी योग्य प्रतीचे गोदाम भाड्याने घेऊन गोदाम मालकाशी विहित मुदतीचा नोंदणीकृत भाडे करार करावा.

२. गोदामाचा व गोदामातील सुपारीचा / काजूबीचा विमा उतरविण्याची जबाबदारी बाजार समितीची राहिल.

३. तारण योजनेसाठी बाजार समितीने भाड्याने घेतलेल्या गोदामाचे भाडे व विमा खर्च बाजार समितीने सहन करावा.

४. बाजार समितीने पुर्णपणे स्वत:च्या जबाबदारीवर उत्पादक शेतकऱ्याची योग्य प्रतीची काजूबी तसेच असोली (कवचासह) वाळविलेली सुपारी या शेतमालाची प्रत व गुणवत्ता विचारात घेऊन तारण कर्ज योजनेत स्विकारावी.

५. प्रत्यक्षात तारण ठेवण्यात आलेल्या सुपारी व काजूबी या शेतीमालाच्या त्यादिवसाचे बाजार भावाच्या कमाल ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु. १००/- प्रती किलो यातील कमी असणारी रक्कम उत्पादक शेतकऱ्यास तारण कर्ज म्हणून वार्षीक ६ टक्के व्याज दराने सहा महिन्यांचे (१८० दिवस) मुदतीकरीता बाजार समितीने स्वनिधीतून अदा करावी.

६. कोणत्याही परिस्थितीत प्रक्रियादार, व्यापारी, आडते, मध्यस्थ यांची सुपारी व काजूबी तारण कर्ज योजनेत स्विकारण्यात येऊ नये.

७. सुपारी व काजूबी साठी प्रतिकिलो रु. १००/- पेक्षा जास्त तारण कर्ज देण्यात येऊ नये.

८. या योजनेअंतर्गत फक्त उत्पादक शेतकऱ्यांना लाभ व्हावा या दृष्टीकोनातून संबंधित शेतकऱ्याचे ७/१२ वरील सुपारीचे लागवड क्षेत्र व सरासरी उत्पादक्ता विचारात घेऊन त्यानूसार सुपारी व काजूबी तारण योजनेत स्विकारण्यात यावी.

९. तारणात स्विकारलेल्या सुपारीची शास्त्रशुध्द पध्दतीने साठवणूक करण्याची तसेच तारणातील सुपारी व काजूबीची योग्यवेळी विक्री करण्याची जबाबदारी बाजार समितीची राहील.

१०. तारणातील सुपारी व काजूबीची विक्री करताच बाजार समितीने तारण कर्ज व त्यावरील व्याज वजा जाता उर्वरित रक्कम त्वरित शेतकऱ्याला अदा करावी.

**सहपत्र - २**

## शेतमाल तारण कर्ज योजना राबविणेची कार्यपध्दती

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत राबविण्यात येत असलेली शेतमाल तारण कर्ज योजना राबविणेसंबधीची कार्यपध्दती या कार्यालयाने वेळोवेळी परिपत्रकान्वये कृषि उत्पन्न बाजार समित्यांना कळविलेली आहे. शेतमाल तारण कर्ज योजनेमध्ये एकसुत्रीपणा व पारदर्शकता तसेच योजनेवर योग्य ते नियंत्रण रहाण्यासाठी या कार्यपध्दतीनूसार सर्व बाजार समित्यांनी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर कार्यपध्दती आवश्यकतेनुसार पुढीलप्रमाणे सुधारणासह देण्यात येत आहे.

१. शेतमाल तारण कर्ज योजना राबवू इच्छिणाऱ्या बाजार समितीने या सोबत दिलेल्या **नमुना पत्रानूसार** सर्व माहिती कृषि पणन मंडळाच्या संबंधीत विभागीय कार्यालयास सादर करावी.

२. बाजार समितीने कृषि पणन मंडळास कळविलेल्या तारखेस तारण योजनेमध्ये शेतमाल स्विकारण्यास सुरूवात करावी. याबाबत पुढीलप्रमाणे सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३. जे शेतकरी शेतमाल तारण कर्ज योजनेमध्ये ठेवण्यासाठी माल घेऊन येतील त्यांचा **नमुना - १** नुसार अर्ज भरून घेण्यात यावा.

४. सदरचा अर्ज घेतल्यानंतर शेतमालाची शासकिय / बाजार समितीने नेमणुक केलेल्या प्रतवारीकार यांनी तपासणी करावी व **नमुना - २** नुसार प्रमाणपत्र द्यावे.

५. प्रतवारीकार यांचे शिफारशीनंतर शेतमालाचे वजन करावे व त्यादिवशीच्या बाजार भाव / दरा नूसार एकुण किंमतीच्या कृषि पणन मंडळाने निश्चित केलेली मर्यादा विचारात घेऊन तारण कर्ज मंजूर करून **नमुना - ३** नुसार प्रॉमेसरी नोट घ्यावी व **नमुना - ४** नुसार करार पत्र करून घ्यावे.

६. करारपत्र घेतल्यानंतर **नमुना - ५** नुसार शेतकऱ्यास मालाची पोहोच पावती द्यावी.

७. मालाची पोचपावती दिल्यानंतर गोदाम व्यवस्थापकाने **नमुना - ६** प्रमाणे तारण ठेवलेल्या मालाची दैनंदिन आवक रजिस्टर मध्ये नोंद करावी व सदरच्या नोंदी तारीखवार करून प्रत्येक तारखेला तारण ठेवलेल्या मालाची **नमुना - ७** नुसार असलेल्या स्टॉक रजिस्टरमध्ये नोंद करावी. अनेक प्रकारचे शेतमाल तारण ठेवले असल्यास प्रत्येक शेतमालाच्या वेगवेगळया नोंदी कराव्यात.

८. मालाची पोहोच पावती पाहुन **कर्जदार शेतकऱ्याला NEFT / RTGS द्वारे** तारण कर्जाची रक्कम अदा करावी व **नमुना - ८** नुसार पावती घ्यावी.

९. रक्कम अदा केल्यानंतर **नमुना - ९** नुसार ठेवलेल्या खातावणीमध्ये कर्जदाराचे स्वतंत्र खाते ठेवावे.

१०. १८० दिवसांचे आत बाजार समितीने माल विक्री केल्यास अथवा शेतकऱ्याने माल विक्रीची व्यवस्था केल्यास विक्री झालेल्या मालाची **नमुना - ७** नुसार ठेवलेल्या रजिस्टर मध्ये नोंद करावी.

११. माल विक्री झाल्यानंतर कर्ज व व्याजापोटी जमा झालेल्या रक्कमेची **नमुना - ९** नुसार ठेवलेल्या वैयक्तीक खातावणी मध्ये नोंद करावी. सदरची नोंद करताना आकारलेल्या व्याजाचे नोंदीपुढे संबंधीत शेतकऱ्याचे नांव नमुद करावे व कर्जाची आकारणी झालेल्या व्याजा इतकी रक्कम जमा घ्यावी. विक्री झालेल्या शेतमालाची माहिती ERP प्रणालीमध्ये दररोज नियमितपणे भरणेत यावी.

१२. विक्री झालेल्या मालाच्या रक्कमेमधून कर्ज व अनुषंगिक खर्चाची रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम NEFT / RTGS द्वारे संबंधीत शेतकऱ्यास त्वरित परत करावी व **नमुना - ८** नुसार पावती घ्यावी.

१३. विक्री झालेल्या मालाचे वजन वगैरे आवश्यक बाबींची पुर्तता झाल्यानंतर त्या विक्रीची तपशिलवार माहिती **नमुना - १०** नुसार ठेवलेल्या रजिस्टर मध्ये नोंद करावी.

१४. तारण कर्ज योजने अंतर्गत होणाऱ्या सर्व व्यवहाराबाबतची माहिती बाजार समितीने ERP प्रणालीमध्ये दररोज नियमितपणे भरणे बाजार समितीस बंधनकारक आहे.

१५. प्रत्येक वेळी मालाची विक्री झाल्यानंतर माल तारण ठेवल्यामुळे शेतकऱ्याला किती जास्त दर मिळाला हे दर्शविणारा तपशिलवार तक्ता तयार करून पणन मंडळाचे विभागीय कार्यालयाकडे पाठवावा व स्थानिक वर्तमान पत्रात त्यास बातमीद्वारे प्रसिध्दी द्यावी. विभागीय कार्यालया मार्फत सदर माहिती एका तक्त्यामध्ये एकत्रित करून दरमहा मुख्यालयास सादर करावी.

१६. विभागीय कार्यालयातील अधिकारी यांनी बाजार समितीस भेटीच्यावेळी वरील प्रमाणे सर्व नोंदी समितीने योग्य प्रकारे ठेवल्या असल्याची खात्री करूनच तारण कर्ज रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यास मुख्यालयाकडे शिफारस करावी.

**शेतमाल तारण कर्ज योजना राबविणाऱ्या बाजार समितीने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास कळविणेबाबतचे पत्राचा मसुदा.**

**प्रति,**

**मा. विभागीय उपसरव्यवस्थापक,**
महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,
विभागीय कार्यालय, ---------------.

**विषय :- सन २०२०-२१ या हंगामात शेतमाल तारण कर्ज योजना राबविणेबाबत.**
**संदर्भ :-** १. कृषि पणन मंडळाचे जा.क्र.कृपमं/शेताकयो/अंमलबजावणी/२०१९-२०/ / २०२०, दि. /०९/२०२० चे परिपत्रक.
२. बाजार समितीच्या मा. संचालक मंडळाच्या दि. / /२०२० रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र. .

महोदय,

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या शेतमाल तारण कर्ज योजने अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये आमच्या -------------------------- कृषि उत्पन्न बाजार समिती, जि.-------- ------------------- ने ------------------------------------------------------- इ. शेतमालासाठी रक्कम रू. .०० इतक्या तारण कर्जाचे वाटप करण्याचा निर्णय समितीच्या दि. / /२०२० रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र. अन्वये घेतलेला आहे. (सोबत ठरावाची प्रत जोडण्यात आलेली आहे.) बाजार समिती दि. / /२०२ पासुन या योजनेचा शुभारंभ करणार आहे.

कृषि पणन मंडळाने संदर्भ क्र. २ चे परिपत्रकासोबत दिलेल्या **सहपत्र - १** नुसार कळविलेल्या सर्व अटी व शर्ती बाजार समितीस मान्य आहेत. योजना राबविण्यासाठी बाजार समिती **सहपत्र - २** नुसार सर्व नोंदवह्या व कागदपत्रे (रेकॉर्ड) अद्यायावत ठेवून याबाबतची सर्व माहिती ERP प्रणालीमध्ये दररोज भरण्याची दक्षता घेण्यात येईल. तसेच समिती मार्फत शेतकऱ्यांना स्वनिधितून वितरित केल्या जाणाऱ्या कर्जाचे प्रतिपूर्तीसाठी आवश्यकतेनूसार प्रस्ताव वेळोवेळी सादर करण्यात येतील त्यानूसार समितीस कर्ज रक्कमेची प्रतिपूर्ती करून देण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू

**सभापती / सचिव**
------------ कृषि उत्पन्न बाजार समिती, जि.-------------

## नमुना नं. १

**(जे शेतकरी शेतमाल तारण कर्ज योजनेमध्ये ठेवण्यासाठी शेतमाल घेवून येतील त्यांचा प्रथम खालीलप्रमाणे अर्ज भरुन घेणेत यावा)**

---------------- कृषि उत्पन्न बाजार समिती, -------------- ता.---------------जि.-------------

### शेतमाल तारण कर्ज मागणी अर्ज

दिनांक - / /२०२

प्रति,

**मा.सभापती,**
कृषी उत्पन्न बाजार समिती, ----------------
ता.----------------------
जिल्हा -------------------------

**विषय:- शेतमाल तारण कर्ज मिळणेबाबत.**

महाशय,

मी विनंती अर्ज करतो की, माझी ------------------------ (शेतमालाचे नाव) -------- पोती शेतमाल कर्जासाठी तारण म्हणून घेऊन मला तारण कर्ज म्हणून रक्कम रु. -------------------------- (अक्षरी रु. -----------------------------------------------) मंजूर करावेत. सदरची तारण म्हणून आपल्या ताब्यात घ्यावयाची ------------------------------ (शेतमालाचे नाव) ---------- पोती माझ्या स्वत:च्या मालकीची आहेत आणि त्यावर दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीचा हक्क नाही.

**माझी माहीती खालीलप्रमाणे :**

१. संपूर्ण नाव : ------------------------------------------------------------------------
२. संपूर्ण पत्ता : ----------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------
३. वय : ----------------------------------------------------------------------
४. आधारकार्ड क्र. : ----------------------------------------------------------------------

शेतमाल तारण कर्जासाठी द्यावयाच्या करारपत्रात नमूद केलेल्या सर्व अटी मी समजून घेतल्या आहेत व त्या मला मान्य आहेत.

आपला विश्वासू,

**सही/-**

वरीलप्रमाणे श्री. --------------------------------- यांची ----------------- (शेतमालाचे नाव) -------- पोती एकुण वजन --------------- क्विंटल --------------- किलो तारण म्हणून ठेऊन त्या दिवशी असलेला बाजारभाव लक्षात घेऊन होणाऱ्या किंमतीच्या ----------- टक्के इतकी रक्कम रु. --------------- (अक्षरी रु. ----------------------------------) तारण कर्ज म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

**सचिव** **सभापती**

## नमुना नं. २

**(शेतकऱ्याने तारणात ठेवण्यासाठी अर्ज दिल्यानंतर त्या शेतमालाची शासकीय/बा.स.च्या प्रतवारीकार यांनी तपासणी करुन खालिलप्रमाणे प्रमाणपत्र द्यावे)**

### प्रतवारीकाराचा दाखला

---------------- कृषि उत्पन्न बाजार समिती -------------- ता. ----------------- जिल्हा ----------- शेतकऱ्याचे नाव ----------------------------------------, गांव --------------------------- आधारकार्ड क्र. -----------------, शेतमालाचा प्रकार ---------------------- पोत्यांची संख्या ----------------------- ओलाव्याचे प्रमाण -------------------------------चाळण केली आहे काय ? ------------

सदरचा शेतमाल तारण म्हणून स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**शासकीय प्रतवारीकार** **बाजार समिती प्रतवारीकार**

---

## नमुना नं. ३

**(प्रतवारीकार यांचे शिफारशीनंतर शेतमालाचे वजन करुन त्या दिवसाच्या बाजारभावानुसार एकूण किंमतीच्या कृषी पणन मंडळाने निश्चित केलेली मर्यादा विचारात घेऊन तारण कर्ज रक्कम देणेबाबत शेतकऱ्यांची खालिलप्रमाणे वचन चिठ्ठी घ्यावी)**

### वचन चिठ्ठी

रु. -------------------------- तारीख : ----------------------------

मी ---------------------------------------------- कृषि उत्पन्न बाजार समितीने मागणी करताच रक्कम रु. ---------------------- (अक्षरी रु. -----------------------------------------) त्यावरील वार्षिक ६ टक्के दराने होणाऱ्या व्याजासहीत परत करण्याचे वचन देत आहे.

**सही/-**

## नमुना नं. ४

**(प्रतवारीकार यांचे शिफारशीनंतर शेतमालाचे वजन करुन त्या दिवसाच्या बाजारभावानुसार एकूण किंमतीच्या कृषि पणन मंडळाने निश्चित केलेल्या मर्यादे एवढी रक्कम तारण म्हणून देणेबाबत शेतकऱ्याचे खालीलप्रमाणे करारपत्र करुन घ्यावे)**

------------- कृषि उत्पन्न बाजार समिती, --------------- ता. --------------- जिल्हा. -------------

**करारपत्र**

**करार लिहून घेणार** : -----------------------------------------------------
सचिव, -------------------- कृषि उत्पन्न बाजार समिती, ----------------
मु.पो. -------------------- ता. --------------- जिल्हा ----------------

**करार लिहून देणार** : (कर्जदार शेतकरी नांव व पत्ता)

कारणे करार लिहून देतो की,

ज्या अर्थी मी --------------------- कृषि उत्पन्न बाजार समितीच्या -------------- संकलन केंद्रावर माझ्या मालकीची ---------------------- (शेतमालाचे नाव) --------- पोती वजन क्विं. ------- कि. ---------- तारण म्हणून ठेवून रक्कम रु. ---------------------- (अक्षरी रु. ----------------------------------------) तारण कर्ज म्हणून दि. -------------------------- रोजी घेतलेली आहे.

त्या अर्थी --------------------- कृषि उत्पन्न बाजार समितीच्या खालील अटी मी ह्या कराराद्वारे मान्य करीत आहे.

१) मी तारण म्हणून ठेवलेल्या पोत्यांची टेंडर पध्दतीने वा खुल्या लिलाव पध्दतीने वा बाजार समिती प्रसंगानुरुप ठरवेल त्या पध्दतीने १८० दिवसाचे आत विक्री करण्याचे अधिकार -------------- कृषि उत्पन्न बाजार समितीला देत आहे.
२) तारण कर्ज रक्कम रु. ---------------------- वर द.सा.द.शे. ६ टक्के दराने तारण ठेवल्याच्या तारखेपासून ते शेतमालाची अंतिम विक्री होईपर्यंतच्या मुदतीचे व्याज देण्यास मी मान्यता देत आहे.
३) शेतमाल तारण ठेवल्यापासून शेतमाल विक्री होईपर्यंत बाजार समितीने वेळोवेळी आवश्यकतेनुसार हमाली, तोलाई व तद्नुषंगिक केलेला खर्च देण्यास मी मान्यता देत आहे.
४) मी तारण म्हणून ठेवलेल्या शेतमालाची विक्री झाल्यानंतर ह्या विक्रीच्या रकमेतून कर्ज म्हणून घेतलेली रक्कम, त्यावर होणारे व्याज, हमाली, तोलाई, बारदान वगैरे झालेला खर्च वजा करुन राहिलेली रक्कम NEFT/RTGS द्वारे स्विकारण्यास मी मान्यता देत आहे.
५) माल साठवणुकीमुळे मालाचे वजनात येणारी नैसर्गिक घट मला मान्य राहील. त्याबाबत मी कोणत्याही प्रकारची तक्रार करणार नाही. त्याचप्रमाणे बारदान परत मिळणार नाही, हे मला मान्य आहे.
६) याबाबत कोणत्याही प्रकारचा वांदा निर्माण झाल्यास ----------- कृषि उत्पन्न बाजार समितीची वांदा समिती देईल त्या निर्णयास मी बांधील राहील व सदरचा निर्णय अंतिम असेल हे मला मान्य आहे.

| **करार लिहून देणार** | **करार लिहून घेणार** |
|---|---|
| साक्षीदार १) ---------------------------- | साक्षीदार १) ------------------------------ |
| २) --------------------------- | २) ----------------------------- |

**नमुना नं. ५**

**(शेतकऱ्याने वचन चिठ्ठी व करारनामा करुन दिल्यानंतर त्याला खालीलप्रमाणे मालाची पोहोच पावती द्यावी)**

**<u>तारण म्हणून घेतलेल्या मालाची पोहोच पावती</u>**

पावती नं : दिनांक : / /२०२

श्री. ---------------------------------- रा. ------------------------- यांच्या मालकीची ---------------------- (शेतमालाचे नांव) ------------ पोती शेतमाल तारण कर्जास तारण म्हणून गोदामात ठेवण्यासाठी स्विकारीत आहे.

| अ.क्र. | मालाचा प्रकार | पोत्यांची संख्या | प्रत्येक पोत्याचे वजन | एकूण वजन | तारण कर्ज म्हणून दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**माल ठेवणाऱ्याची सही** **गोदामकिपरची सही**

-------------------------------------------------------------------------------------------

**नमुना नं. ६**

**(मालाची पोहोच पावती दिल्यानंतर माल गोदामात ठेवून गोदाम व्यवस्थापकाने खालीलप्रमाणे तारण मालाची दैनंदिन आवक रजिस्टरमध्ये नोंद करावी.)**

**<u>दैनंदिन आवक रजिस्टर</u>**

| अ.नं. | शेतकऱ्याचे नांव | शेतमालाचे नांव | पोत्यांची संख्या | पोत्यांचे वजन | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## नमुना नं. ७

**(तारणात ठेवलेल्या तसेच शेतकऱ्याने १८० दिवसाचे आत विक्री केलेल्या मालाच्या खालीलप्रमाणे तारीख व वार निहाय स्टॉक रजिस्टरमध्ये नोंदी कराव्यात. अनेक प्रकारचा शेतमाल तारणात ठेवला असल्यास प्रत्येक शेतमालाच्या वेगवेगळया नोंदी कराव्यात.)**

### <u>स्टॉक रजिस्टर</u>

| तारीख | शेतमालाचे नाव | मागील शिल्लक माल | | आवक | | जावक | | अखेर शिल्लक | | वाढ वा तूट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पोती | वजन | पोती | वजन | पोती | वजन | पोती | वजन | वजन |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

-----------------------------------------------------------------------------------------------

## नमुना नं. ८

**(तारणातील मालाची पोहोच पावती पाहून कर्जदार शेतकऱ्याला NEFT / RTGS द्वारे तारण कर्जाची रक्कम अदा करावी व खालीलप्रमाणे त्याच्याकडून पावती घ्यावी. )**

### <u>पावती</u>

मी श्री. ------------------------------------- रा. ------------------------------------ पावती लिहून देतो की, मी तारण म्हणून ठेवलेल्या शेतमालाचे तारणावर मला मंजूर झालेली तारण कर्जाची रक्कम रु. --------------------- (अक्षरी रु. ---------------------------------------------------) माझे ----------- -------------------------------- या बँकेतील खाते क्र. --------------------- मध्ये NEFT / RTGS व्दारे दि. / /२०२ रोजी जमा करण्यात आली असुन सदर रक्कम मला मिळाली आहे.

**सही/-**

## नमुना नं. ९

**(शेतकऱ्याला रक्कम अदा केल्यानंतर तसेच माल विक्री झाल्यानंतर कर्ज व व्याजापोटी जमा झालेल्या रकमेच्या नोंदी खालीलप्रमाणे ठेवलेल्या खतावणीमध्ये कर्जदाराचे स्वतंत्र खाते ठेवावे)**

### <u>वैयक्तिक खतावणी</u>

कर्जदाराचे नांव : ------------------------------------------------------------

गांव : ------------------------------------------------------------

तारण ठेवलेल्या पोत्यांची संख्या : ------------------------------------------------------------

तारण ठेवलेल्या मालाचे वजन : ------------------------------------------------------------

| तारीख | तपशील | जमा | नांवे | येणे वा देणे | येणे वा देणे रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

---------------------------------------------------------------------------------------------

## नमुना नं. १०

**(विक्री झालेल्या मालाचे वजन वगैरे आवश्यक बाबींची पूर्तता झाल्यानंतर त्या विक्रीची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे रजिस्टरमध्ये करावी.)**

### विक्री झालेल्या मालाचे रजिस्टर

| तारीख | खरेदीदाराचे संपूर्ण नाव व पत्ता | विक्री केलेल्या शेतमालाचे नाव | पोत्यांची संख्या | पोत्यांचे एकुण वजन | कोणत्या दराने माल विकला |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |

| मालाची होणारी किंमत | कोणत्या तारखेला माल विकला | वजन केल्याची तारीख | मालाची रक्कम मिळालेली तारीख | माल खरेदीदाराच्या ताब्यात दिल्याची ता. | पणन मंडळाकडे रक्कम NEFT/RTGS ने पाठविल्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | |
| | | | | | | |

(तारण कर्ज योजने अंतर्गत होणाऱ्या व्यवहाराचे पणन मंडळाकडे पाठवावयाच्या साप्ताहिक अहवालांचे नमुने)

तक्ता क्र. १) -------------------- कृषि उत्पन्न बाजार समिती, --------------- ता.----------------जि.--------------

शेतमाल तारण कर्ज योजने अंतर्गत तारणात ठेवलेल्या मालाचा साप्ताहिक अहवाल (दि. / /२०२ ते दि. / /२०२ )

| योजने अंतर्गत गोदामातील मागील शिल्लक | | | चालू सप्ताहात तारण ठेवलेला शेतमाल | | चालू सप्ताहात विक्रीसाठी परत केलेला शेतमाल | | सप्ताहाअखेर शिल्लक शेतमाल | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शेतमालाचे नांव | शेतकरी संख्या | वजन क्विं. कि. | शेतकरी संख्या | वजन क्विं. कि. | शेतकरी संख्या | वजन क्विं. कि. | शेतकरी संख्या | वजन क्विं. कि. |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

--------------------------------------------------------------------------------

तक्ता क्र. २) -------------------- कृषि उत्पन्न बाजार समिती, --------------- ता.----------------जि.--------------

कर्ज वाटपाचा साप्ताहिक अहवाल (दि. / /२०२ ते दि. / /२०२ )

| अ. क्र. | तारण कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्याचे नांव | आधार कार्ड क्र. | तारण ठेवलेला शेतमाल | वजन क्विं. कि. | माल तारणात ठेवलेल्या दिवसाचा बाजार भाव (प्रती क्वि.) | बाजार भावानूसार एकुण किंमत (१०० टक्के) | दिलेले ७५ टक्के तारण कर्ज रक्कम रू. | कर्ज दिल्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

--------------------------------------------------------------------------------

**तक्ता क्र.३)** -------------------- कृषि उत्पन्न बाजार समिती, --------------- ता.---------------जि.--------------

**विक्री केलेल्या व विक्रीसाठी शेतकऱ्याला परत केलेल्या शेतमालाचा साप्ताहिक अहवाल (दि. / /२०२ ते दि. / /२०२ )**

| शेतमालाचे नांव | बा.स. ने विक्री केलेल्या मालाचे वजन क्विं. कि. | कोणाला विकला | विक्रीचा दर (प्रती क्वि.) | विक्रीची रक्कम रू. | विक्री केल्याची तारीख | विक्रीची रक्कम मिळाल्याची तारीख | विक्रीची रक्कम NEFT/RTGS ने पणन मंडळाकडे पाठविल्याची तारीख | विक्रीसाठी शेतकऱ्याला परत केलेला माल क्वि. कि. | तारण कर्जाची व्याजासहित वसूल केलेली रक्कम रू. | रक्कम मिळाल्याची तारीख | रक्कम NEFT/RTGS ने पणन मंडळाकडे पाठविल्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |